PUNE METROPOLIS

# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ, आकुर्डी, पुणे – ४११०४४

Pune Metropolitan Region Development Authority, Pune

New Administrative Building, Near Akurdi Railway Station, Akurdi, Pune - 411044

Ph No.: 020- 27652934 Email: Email: ad.pmrda@gmail.com


प्रशा/क.ज.अ.जाहिरात/प्र.क्र.४६/२०२५/ ९८८९ दि. ०६/११/२०२५

## जाहिर सुचना

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे येथील कार्यालयात मंजूर आकृती बंधातील रिक्त असलेले माहिती व जनसंपर्क अधिकारी हे पद व आकृतीबंधाव्यतिरिक्त रिक्त असलेले सहाय्यक जनसंपर्क अधिकारी या पदाची कामे पार पाडण्यासाठी ११ महिने करार पध्दतीने नियुक्तीसाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, प्रशासन विभाग, नविन प्रशासकीय इमारत, आकुडी, पुणे यांचेकडे दि.०७/११/२०२५ ते दि.१०/११/२०२५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर अर्ज ad.pmrda@gmail.com या ईमेलवर किंवा कार्यालयीन पत्त्यावर पाठविण्यात यावेत. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

| अ.क्र. | पदनाम | कामाचे स्वरुप | उमेदवाराची पात्रता | मासिक मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | माहिती व जनसंपर्क अधिकारी (१ जागा) | १. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या विकास प्रकल्पांची माहिती व याजनांची माहिती माध्यमांव्दारे (इलेक्ट्रानीक मिडीया, प्रिंटमिडीया, सोशल मिडीया या व्दारे नागरीकांपर्यत पोहचविणे.<br>२. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील विविध कार्यक्रमांची वर्तमानपत्रात जाहीरात देणे, कार्यक्रमांच्या अनुषंगाने प्रसिध्दी, फोटो वितरण करणे.<br>३. प्राधिकरण कामकाजावावत पत्रकार परिषदांचे आयोजन करणे.<br>४. मा. महानगर आयुक्त यांचे विविध कार्यक्रमांचे उदा. भूमिपूजन, उद्घाटन इ. वावत आयोजन करणे, कार्यक्रमांच्या निमंत्रण पत्रिका तयार करणे.<br>५. प्राधिकरणास भेट देणा-या अभ्यांगतांचे / वरिष्ठ अधिका-यांचे शिष्टमंडळ यांचे कार्यक्रम / प्रवास इ. वावत नियोजन करणे, व त्याअनुषंगाने विविध विभागांकडे जवावदारी सोपविणे.<br>६. प्राधिकरणात येणा-या अभ्यांगत / मान्यवर यांचे स्वागत करणे. | १) पत्रकरिता व जनसंज्ञापन (Journalism & Mass Communication) मधील आवश्यक पदवी<br>२) शासकीय / निमशासकीय /नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेतील अथवा खाजगी संस्थेतील माहिती व जनसंपर्क अधिकारी या पदाचा किमान ५ वर्षाचा अनुभव | रु ६५,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | सहाय्यक जनसंपर्क अधिकारी (१ जागा) | १. माहिती व जनसंपर्क अधिकारी यांनी सोपविलेले कामकाज करणे.<br>२. सहाय्यक जनसंपर्क अधिकारी म्हणून कामकाज करणे.<br>३. माहिती व जनसंपर्क अधिकारी यांना कामकाजात सहाय्यक म्हणून कामकाज करणे. | १) पत्रकरिता व जनसंज्ञापन (Journalism & Mass Communication) मधील आवश्यक पदवी<br>२) शासकीय / निमशासकीय /नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेतील अथवा खाजगी संस्थेतील माहिती व जनसंपर्क अधिकारी या पदाचा किमान ३ वर्षाचा अनुभव | रु. ५०,०००/- |

अटी व शर्ती :-

१. प्राधिकरण कार्यालयात प्रतिनियुक्ताने / सरळसेवेने अधिकारी उपलब्ध झाल्यास करारपध्दतीने दिलेली नियुक्ती रद्द करण्यात येईल.
२. मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असणे आवश्यक.
३. सदरची पदे निव्वळ ११ महिन्याच्या कालावधीकरीता कंत्राटी पध्दतीने घेण्यात येणार असून पदाचा कार्यकाळ ११ महिन्याचा असेल.
४. वृत्तपत्रातील अनुभव महत्वाचा.
५. सदर उमेदवार शारीरीक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.
६. नियुक्त उमेदवारास पूणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे व औंध कार्यालय, पुणे तसेच प्राधिकरण क्षेत्रातील तालुका कार्यालये येथे काम करावे लागेल. तसेच सोपविण्यात आलेले कामकाज करणे आवश्यक आहे.
७. कराराच्या कालावधीत नियुक्त उमेदवार महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांच्या नियंत्रणाखाली काम करतील व वेळोवेळी महानगर आयुक्त याना कामकाज अहवाल सादर करतील.
८. उमेदवाराने सदर पदाकरीता जाहीरातीच्या दिनांकापासून ०४ दिवसाच्या आत सह आयुक्त, प्रशासन, पहिला मजला, प्रशासन विभाग, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे ४११०४४. या पत्यावर पोहचेल अश्या रितीने अर्ज पोस्टाने पाठवावा अथवा कार्यालयात प्रत्यक्ष दाखल करावा अथवा ad.pmrda@gmail.com या मेल आयडीवर मुदतीत पाठवावेत, मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

(पूनम मेहता)
सह आयुक्त, प्रशासन
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे